# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.**(०२०) २६०५०६४१ **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ १०४७ /२०१४
दिनांक १२ / १२/२०१४

प्रति,
तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय विषय:- क वर्ग संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाच्या प्रेसनोट बाबत...**

वरील विषयास अनुसरुन, आपणास कळविण्यात येते कि, महाराष्ट्र सहकारी संस्था,समितीची निवडणूक २०१४ मधील नियम १९ मध्ये नमुद केल्यानुसार क वर्गाच्या संस्थांचा निवडणूकीचा कार्यक्रम त्या संस्थेंच्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्याची तरतुर असुन त्यामध्ये सदर कार्यक्रम हा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तरतुद नाही.

तथापि,निवडणूक ही पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी व तसेच सभासदांच्या माहितीसाठी सर्व तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील क वर्गातील संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची प्रेसनोट तयार करुन जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या मार्फत प्रसिध्द करावी. तसेच शक्य असल्यास तालूक्यातील अशा संस्थांचा एकत्रित कार्यक्रम जाहिर झाल्याबाबत संबंधित संस्थांची एकत्रित संक्षिप्त जाहीरातही स्थानिक वर्तमानपत्रात देण्यास हरकत नसावी जेणेकरुन जाहीरातीवरिल खर्च कमीतकमी राहील.

मा.आयुक्त् राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशाने.

**(डॉ. आनंद जोगदंड)**

सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे